जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४६१ दिनांक - २३/०६/२०२३**

खंडणी विरोधी पथक -०२,गुन्हे शाखा,पुणे शहर

## खंडणी विरोधी पथक -०२,गुन्हे शाखा,पुणे शहर व मिलिटरी इंटेलिजन्स,सदर्न कमांड, लायझन युनिट,पुणे यांचे संयुक्त कारवाईने भारतीय सैन्य दलात अधिकारी असल्याचे सांगुन भारतीय सैन्य दलात भरती करतो असे सांगुन लाखो रुपायांची फसवणुक करणारा व लग्नाचे अमिष दाखवुन महिलेचे शोषण करणारा भामटा जेरबंद

**कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर गुन्हा रजि.क्र.५८४/२०२३,भा.द.वि.कलम ४०६,४२०,३७६(२)(एन),३७७** या गुन्हया मध्ये **प्रमोद भिमराव यादव,वय-२७ वर्षे,रा.अमृतवाडी,ता.जत,जि.सांगली** हा कोंढवा पो स्टे येथे अटक आहे. **प्रमोद भिमराव यादव** याने लष्करी अधिकारी असल्याचे भासवुन,एका महिलेचे शोषण करुन तसेच तिच्याकडून १६ लाख लुबाडून फसवणुक केलेबाबतचा गुन्हा नोंद होता.

तसेच सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी याने तो आर्मी मध्ये अधिकारी असल्याचे सांगुन ८ ते ९ इसमांना आर्मी मध्ये भरती करतो असे सांगुन,त्यांची आर्थिक फसवणूक केली असल्याचे आर्मी इंटेलिजन्स, सदर्न कमांड,लायझन युनिट,पुणे यांचेकडून गुन्हे शाखा,पुणे शहर येथे माहिती मिळाली.

मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,पुणे शहर व मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,पुणे शहर यांनी आरोपीचा शोध घेण्याकरीता खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे व मिलिटरी इंटेलिजन्स अंमलदार यांचे एक पथक तयार केले होते. सदर पाहिजे आरोपीचा सदर पथकाने तांत्रीक विश्लेषण,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे मदतीने सांगोला,जत या ठिकाणी शोध घेता तो मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवुन कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहरकडील वर नमूद गुन्हयामध्ये अटक करण्यात आलेली आहे.

दरम्यानच्या काळात मिलिटरी इंटेलिजन्स,सदर्न कमांड,लायझन युनिट,पुणे यांना संपर्क साधलेले फिर्यादी व इतर आठ साक्षीदार यांचेकडून आधिक चौकशीअंती नमूद आरोपीने आर्मी युनिफॉर्म परिधान करुन, बनावट ओळखपत्र दाखवुन,तो स्वतः सैन्य दलातील आधिकारी असल्याचे भासवुन,फिर्यादी व साक्षीदार यांना आर्मी मध्ये भरती करतो असे खोटे आश्वासन देवुन,त्यांना भरती झालेबाबतची बनावट मेरीट लिस्ट पाठवुन त्यांचेकडून एकुण २८,८८,०००/- रुपये घेवुन फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने,त्याचेविरुध्द कोंढवा पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील अटक आरोपीत याने आतापर्यंत चार लग्न केल्याची सुध्दा माहिती मिळत आहे. सदरचा आरोपी हा माजी सैनिकाचा मुलगा असुन लष्करात भरती होवु न शकल्याने घरातल्या सदस्यांना अंधारात ठेवुन लष्करी सेवेत असल्याचे भासवत होता.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा. अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,(गुन्हे),श्री.अमोल झेंडे, मा.सहा. पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणेचे पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, सहा.पो.निरी.चांगदेव सजगणे, पोलीस उप-निरीक्षक,श्रीकांत चव्हाण, मोहनदास जाधव व पोलीस अंमलदार, विजय गुरव, विनोद साळुंके, संग्राम शिनगारे, ईश्वर आंधळे, सैदोबा भोजराव, अमोल पिलाने, चेतन शिरोळकर व आर्मी इंटेलिजन्स,सदर्न कमांड,लायझन युनिट,पुणे तसेच तांत्रीक विश्लेषण,गुन्हे शाखा,पुणे यांनी केलेली आहे.

नमूद आरोपीत याने अशा प्रकारे कोणाची फसवणुक केली असल्यास पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.